PUBLICATION – SAKAL
DATE – APRIL 21, 2010
PAGE NO. – 9

# 'कॉटनकिंग'चे सुपर प्रिमिअम कॉटन वेअर श्रेणीत पदार्पण



पुणे, ता. २० : पुरुषांसाठीच्या रेडिमेड कॉटन कपड्यांच्या निर्मितीत नावाजलेल्या 'कॉटनकिंग'ने नव्या 'कॉटनकिंग रोयाल' शर्ट मालिकेद्वारे सुपर प्रिमिअम कॉटर वेअर श्रेणीत पदार्पण केले आहे. 'कॉटनकिंग रोयाल' मालिकेत सुरवातीला आम्ही कॉटन आणि लिनन या दोन नैसर्गिक धाग्यांचे वापर असलेल्या वस्त्रापासून प्रिमिअम शर्टची निर्मिती करणार असून, ग्राहकांना एक वेगळा आणि सुखद अनुभव देण्याचा प्रयत्न करणार आहोत, असे कॉटनकिंग प्रा. लि. चे संचालक प्रदीप मराठे यांनी सांगितले. अतिनील किरणांपासून (अल्ट्रा व्हॉयलेट) संरक्षण देण्याची क्षमता असलेल्या लिनन धाग्याचा वापर केलेले 'रोयाल' शर्ट बाजारात सादर करण्याची उन्हाळा हीच योग्य वेळ असल्याचे श्री. मराठे यांनी नमूद केले. यात कॉटन आणि लिनन या दोन धाग्यांचा योग्य वापर केल्यामुळे ग्राहकाला शर्टचा 'लुक', आराम आणि घातक किरणांपासून संरक्षण असा तिहेरी फायदा मिळणार आहे. 'कॉटनकिंग'च्या सर्व दालनांमध्ये २३ एप्रिलपासून हे शर्ट विक्रीसाठी ठेवले जाणार आहेत.